म.वि.प्र.समाजाचे

## कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय उत्तमनगर सिडको नाशिक

# राष्ट्रीय सेवा योजना २०१९-२०२०

## विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर अहवाल

## दि.०२/०१/२०२०

विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर अहवाल पहिल्या दिवशी सकाळ सत्रात उदघाटन करून शिबिराची सुरुवात करण्यात आली. उद्घाटन कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून नानासाहेब महाले संचालक म.वि.प्र.समाज नाशिक प्रमुख अतिथी म्हणून सचिनजी पिंगळे संचालक म.वि.प्र.समाज, गावाचे सरपंच अलकाताईदिवे, कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिडको महविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.जे.डी.सोनखासकर यांनी केले तर सात दिवसातील उपक्रम आणि उद्देश्याविषयी माहिती सातपूर महाविद्यालायचे प्राचार्य डॉ.डी.जी.उशीर यांनी सांगितले.

गावाच्या सरपंचानी गावाचा इतिहास सांगत,गावाची भौगोलिक माहिती सांगितली.व गावातील कामाचा आढावा घेत आपले मनोगत मांडले. प्रमुख अतिथी म्हणून सचिनजी पिंगळे यांनी स्वयंसेवकांना सखोल असे मार्गदर्शन केले. नाना साहेब महाले यांनी आपले अध्यक्षीय भाषण करत सर्वाना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.श्रीमती वर्षा शिरोरे व श्रीमती गायकवाड यांनी केले, सातपूर महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.डी.शेंडगे सरांनी सर्वांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रा.से.यो. जिल्हा समन्वयक रवींद्र अहिरे , कार्यक्रम अधिकारी प्रा. रविराज वटणे, प्रा. श्रीमती एस. एस. गांगुर्डे , प्रा.श्रीमती रिंकू जगताप यांनी प्रयत्न केले.

दुपारच्या सत्रात व्याख्याते म्हणून डॉ. स्मिता पाकधने यांनी आर्थिक साक्षरता तर उपप्राचार्या डॉ. मंगला निकुंभ यांनी गिरणारे गावच्या इतिहासावर या विषयावर व्याख्यान देत उपस्थित सर्वाना सखोल असे मार्गदर्शन केले.

## दि: ०३/०१/२०२०

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी सकाळी नियमित पद्धतीने प्रार्थना घेण्यात आली त्या विद्यापीठ गीत, रा.से.यो. गीत,इतर प्रार्थना घेण्यात आल्या. श्रमदान करण्यासाठी स्वयंसेवकांची विभागणी करत एक गट गावाजवळील अहिल्यादेवी बारवेवर घेऊन जाण्यात आला तर दुसरा गट गावातील प्राथमिक शाळाच्या परिसरात स्वच्छता करण्यात आली .. तर तिसरा गट गाव हद्दीतील बालाजी मठ, बाजारपेठ इत्यादी परिसरात घेऊन जाऊन स्वच्छता मोहीम राबवत तेथील रस्ते, नाले इत्यादी स्वच्छता करण्यात आली. सिडको महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने गिरणारे गावचे इतिहास लेखन करण्यात आले

दुपारच्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून आलेल्या डॉ.प्रतिभा जाधव यांनी जमलेल्या समस्त गावकरी भगिनी व स्वयंसेवकांना सावित्री तू होतीस म्हणूनच या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

## दि.०४/०१/२०२०

शिबिरातील तिसऱ्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन श्रमादानाला सुरुवात करण्यात आली. एक गट गावातील ब्राह्मण नदीवर बंधारा टाकण्यासाठी घेऊन जाण्यात आला. इतर गटाची विभागणी नेमून दिलेल्या श्रमदानाच्या ठिकाणी स्मशानभूमी, कोळीवाडा जाऊन त्यांचे काम पुर्ण केले मानसशास्त्र विभागाच्या वतीने यांनी गावातील ग्रामस्थांच्या मानसिक आरोग्य चाचण्या येऊन गावातील लोकांच्या मानसिक आरोग्याचा आढावा घेतला तसेच सिडको महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने गावचा राजकीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात आला.

दुपारच्या सत्रात व्याख्याते म्हणून आलेल्या नाशिक मधील विधी तज्ञ सुधाकर इंगळे यांनी म्हणून जबाबदारी पार पाडत उपस्थितांना 'ग्राहक संरक्षण हक्क' या विषयावर मार्गदर्शक केले.

## दि.०५/०१/२०२०

शिबिरातील तिसऱ्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन श्रमादानाला सुरुवात करण्यात आली. एक गट गावातील ब्राह्मण नदीवर बंधारा टाकण्यासाठी घेऊन जाण्यात आला. इतर गटाची विभागणी नेमून दिलेल्या श्रमदानाच्या ठिकाणी स्मशानभूमी, कोळीवाडा जाऊन त्यांचे काम पुर्ण केले. तर दुसरा गट गाव हद्दीतील राजवाडा परिसरात घेऊन जाऊन स्वच्छता मोहीम राबवत तेथील रस्ते,नाले, इत्यादी स्वच्छ करण्यात आले. सिडको महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने गावातील लोकांच्या कुठुंबांचे आर्थिक सर्वेक्षण करण्यात आले.

दुपारच्या सत्रात व्याख्याते म्हणून लाभलेल्या डॉ प्रमोद कुमार हिरे यांनी 'शिवचरित्र' या विषयची उत्तम मांडणी करून उपस्थित सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

## दि. ०६/०१/२०२०

शिबिरातील पाचव्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन श्रमादानाला सुरुवात करण्यात आली. एक गट गावातील ब्राह्मण नदीवर बंधारा टाकण्यासाठी घेऊन जाण्यात आला. बंधारा पुर्ण करण्यासाठी जास्तीतजास्त स्वयंसेवकांचा गट नदी परिसरात घेऊन जाण्यात आला आली बंधाऱ्याचे काम पुर्ण करण्यात आले तसेच इतिहासिक आहिल्यादेवी बरवेची स्वच्छता ही आज पुर्ण करण्यात आली.

दुपारच्या सत्रात व्याख्याते म्हणून नाशिक मधील प्रसिध्द वकील ॲड दोंदे यांनी या विषयावर महिला सबलीकरण या विषयावर उत्तम असे व्याख्यान देऊन उपस्थिताना मार्गदर्शन केले.

## दि. ०७/०१/२०२०

शिबिरातील सहाव्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन श्रमादानाला सुरुवात करण्यात आली. ब्राह्मण नदी वरील बंधाऱ्याचे सर्व काम आज पुर्ण करून गावातील अहिल्यादेवी बारवेचा ही सर्व परिसर स्वच्छ केला स्वयंसेवकांनी तेथील ग्रामस्थांसाठी पथनाट्य सादर करण्यात

आली. सिडको महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाच्या वतीने मोफत माती-पाणी परीक्षण शिबिरचे ही आयोजन करण्यात आले होते.

दुपारच्या सत्रात व्याख्याते म्हणून डॉ विजयकुमार वावळे या सत्राच्या शेवटी रा.से.यो. विभाग समन्वयक डॉ. गोरक्षनाथ पिंगळे व कार्यक्रम अधिकारी डॉ. माळी सरांनी शिबिरास भेट देऊन स्वयंसेवकांशी संवाद साधला व उपस्थित सर्वाना मार्गदर्शन केले.

## ०८/०१/२०२०

विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराच्या शेवटच्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना झाल्यानंतर समर्थ भारत अभियानाची सुरुवात करण्यात आली अभियानांतर्गत गाव हद्दीतील परिसरामध्ये रॅली काढण्यात आली. त्या वेगवेगळ्या घोषणा देत स्वयंसेवकांनी विविध सामाजिक विषयावर जनजागृती करण्याचा प्रयत्न केला तसेच गावहद्दीतील बालाजी मठ, अहिल्यादेवी बारव परिसर, कोळीवाडा व राजवाडा परिसरात सर्व महाविद्यालयाच्या वतीने पथनाट्य सदर करण्यात आले.

दुपारच्या सत्रात शिबिराचा समारोप संपन्न झाला त्या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नानासाहेब महाले संचालक म.वि.प्र.समाज नाशिक, प्रमुख अतिथी म्हणून सचिन पिंगळे साहेब संचालक म.वि.प्र.समाज नाशिक, डॉ.सुनीलजी ढिकले चिटणीस म.वि.प्र. समाज नाशिक तिन्ही महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. सोमनाथ घुले यांनी तर प्रास्ताविक प्राचार्या आदरणीय डॉ.जे.डी.सोनखासकार यांनी केले स्वयंसेवकामधून प्रत्येक महाविद्यालयाच्या एकाने आपले अनुभव व्यक्त केले.प्रमुख पाहुण्यांनी आपले मार्गदर्शन केल्यानंतर ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने मनोगत व्यक्त केले व शिबिरात झालेल्या कामाचा लेखाजोखा मांडला. अध्यक्षीय भाषणात नानासाहेब महाले यांनी सर्वाना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. डी.जी.उशीर यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यक्रम अधिकारी रा.से.यो. जिल्हा समन्वयक रवींद्र अहिरे , कार्यक्रम अधिकारी प्रा. रविराज वटणे, प्रा.एम.डी.शेंडगे, प्रा. श्रीमती एस. एस. गांगुर्डे , प्रा.श्रीमती वर्षा शिरोरे प्रा.श्रीमती रिंकू जगताप, यांनी प्रयत्न केले. सातदिवशीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर उत्तमरीत्या व यशस्वीपणे पूर्ण केले.

**कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.**
**(प्रा.रविराज वटणे)**

**प्राचार्या**
**(डॉ. जे.डी.सोनखासकर)**